खे.ता.शि.प्र.मंडळाचे,

# साहेबरावजी बुट्टेपाटील महाविद्यालय

राजगुरुनगर

## राज्यशास्त्र विभाग

## शैक्षणिक वर्ष २०२५ - २६

## वार्षिक अहवाल

महाविद्यालयातील राज्यशास्त्र विभाग अंतर्गत शैक्षणिक वर्ष २०२५ - २६ मध्ये प्रथम वर्ष कला या वर्गात एकूण १२० विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतला. या वर्गात एकूण ८० विद्यार्थ्यांनी राज्यशास्त्र या विषयाची निवड केली. द्वितीय वर्षामध्ये एकूण २३ विद्यार्थ्यांनी विशेषस्तर म्हणून राज्यशास्त्र या विषयाची निवड केली. दरवर्षीप्रमाणे याही वर्षी महाविद्यालयांमध्ये अत्यंत उत्साहात २६ नोव्हेंबर हा दिवस "संविधान गौरव दिन" म्हणून साजरा करण्यात आला. या दिनानिमित्त महाविद्यालयामध्ये संविधाना प्रती जनजागृती एकत्रित संविधान उद्देशिका वाचन करण्यात आले. तसेच महाविद्यालयामध्ये सद्भावना दिनानिमित्त राष्ट्रीय एकता आणि एकात्मतेची शपथ घेण्यात आली. नवीन शैक्षणिक धोरणानुसार प्रथम व द्वितीय वर्ष कला शाखेतील विद्यार्थ्यांचे प्रात्यक्षिक कार्य घेण्यात आले. बहिस्थ पर्यवेक्षक नियुक्त करून विद्यार्थ्यांच्या प्रात्यक्षिक कार्याची मौखिक परीक्षा देखील घेण्यात आली. Feild Visit अंतर्गत राज्यशास्त्र विषयाच्या विद्यार्थ्यांना राजकीय सहाय्यकाची भूमिका समजून घेण्यासाठी खेड तालुक्याचे विद्यमान आमदार मा.श्री. बाबाजी काळे यांच्या कार्यालयास भेट देखील देण्यात आली. अशाप्रकारे शैक्षणिक वर्ष २०२५-२६ मध्ये विद्यार्थ्यांच्या विविध कलागुणांना वाव देण्यासाठी विशेष स्तरावर प्रयत्न करण्यात आले.